# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.०५/२३/अ.क्र.६५९४/२५/०१**

**श्री. दिपक खामकर**
प्लॉट क्र. २०२/क१, सागर सह.गृह. संस्था,
सेक्टर क्र. २, चारकोप,
कांदिवली (प.) मुंबई-६७

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प्रवप) स्थापत्य पजवा**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) शहर यांचे कार्यालय,
इंजिनिअरींग हब इमारत, तळ मजला, डॉ. ई. मोझेस रोड,
वरळी नाका, वरळी, मुंबई-४०००१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रवप) पजवा**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) शहर यांचे कार्यालय,
इंजिनिअरींग हब इमारत, तळ मजला, डॉ. ई, मोझेस रोड,
वरळी नाका, वरळी, मुंबई-४०००१८

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१६.१०.२०२५रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प्रवप) पजवा (स्था.), श्री. देविदास गुरूनाथ भोईर उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रवप) पजवा अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. दिपक खामकर यांनी दाखल केलेल्या जोडपत्रानुसार सन २०२१-२२ या कालावधीत शहर विभागातील (CH०.००मीटर ते १२८०.००मीटर) तसेच निगडीत टेल चॅनेल व मिठी नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील धारावी ब्रिजपासून ते नवीन बिकेसी कनेक्टर ब्रिजपर्यंत गाळ काढणे या कामाची एकूण ६ मुद्द्यांची माहिती मागितली असून वरील माहिती पेन ड्राईव्ह किंवा सी.डी. किंवा ई-मेल द्वारे द्यावी. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४(१)(ख) त्यातील कलम १४ अन्वये वरील संपूर्ण माहिती ही स्वयंप्रेरणने संकेतस्थळावर टाकणे अनिवार्य/बंधनकारक असल्याचेही नमूद केले आहे. यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प्रवप) स्थापत्य पजवा यांनी मागितलेली ही कार्यालयात दस्ताऐवज स्वरुपात उपलब्ध असलेली एकूण ९८७२ पृष्ठे उपलब्ध असून त्याकरिता प्रती प्रत

रु.२/- असू एकूण रु.१९७४४/- इतके म.न.पा.च्या केंद्रामध्ये भरल्यानंतर व त्याची छायांकित प्रत सादर केल्यानंतर पुढील ७ दिवसात माहिती देण्यात येईल.

यावर अपिलार्थी यांनी सदर आकारलेले शुल्क हे अवाजवी असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ७(३) चे उल्लंघन केलेले आहे. तसेच मनपा प्रशासनाच्या धोरणानुसार ठेकेदारामार्फत करण्यात येणारे सर्व कामे यांची माहिती सॅपप्रणाली अंतर्गत वेळोवेळी संबंधित अधिकारी यांनी अद्यावत ठेवणे, हे त्यांचे कर्तव्य असून मनपा आयुक्तांचे दि.१९.०५.२०१५ अन्वये आदेशाचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून येते, असे नमूद केलेले आहे. यावर दि.२९.०९.२०२२ रोजी सुनावणी सूचना जारी करण्यात आली असून दि.०६.१०.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री. मिलींद साटम उपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रवप) पजवा यांनी त्यांच्या आदेशात सदर माहिती मनपा संकेत स्थळावर दर्शविलेल्या पाथप्रमाणे उपलब्ध असल्याचे सांगून तेथूनच प्राप्त करून घ्यावे असे आदेश पारित केले. पारित केलेल्या आदेशाच्या प्रत अद्यापही प्रदान केली नसल्याचा आक्षेप नोंदवित दि.१३.१२.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली व्यापक व विस्तृत स्वरुपाची असून यातील जी माहिती ही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध आहे, ती अपिलार्थी यांच्या ई-मेल वर, तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४(१)(ख) अन्वये बंधनकारक असून उर्वरित माहिती छायांकित किंवा दस्ताऐवज स्वरूपात आहे, ती मात्र सशुल्क प्राप्त करून देण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प्रवप) पजवा (स्था.) यांनी दिलेला प्रतिसाद हा प्रथम दर्शनी माहिती अधिकार अधिनियमांशी सुसंगत असल्याचे आढळून येते. अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य असल्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प्रवप) पजवा (स्था.) यांनी सुचित केल्याप्रमाणे सशुल्क प्राप्त करून घ्यावी. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

१६.१०.२०२५